खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३४५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२६ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## अखेर प्रधानांचा राजीनामा झालाच ! पायउतार झाले प्रधान अन् चर्चेत आलं राजनाथांचं विधान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नवी दिल्ली :** केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह चर्चेत आलं आहे. मोदी सरकारमध्ये गेल्या १२ वर्षांपासून मंत्री असलेल्या राजनाथ सिंह यांचं विधान व्हायरल झालं आहे. एनडीए सरकारमध्ये मंत्र्यांचे राजीनामे होत नाहीत, असं वक्तव्य राजनाथ सिंह यांनी केलं होतं.

गेल्या महिन्याभरापासून कॉकरोच जनता पार्टीचं दिल्लीत आंदोलन सुरू होतं. जंतरमंतरवर हजारो विद्यार्थी आंदोलन करत होते. नीट पेपर फुटीची जबाबदारी घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी कॉकरोच जनता पार्टीनं केली होती. अखेर प्रधान यांनी आज राजीनामा दिला. यानंतर कॉकरोच जनता पार्टीच्या व्यासपीठावर आणि आंदोलनस्थळी एकच जल्लोष झाला.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी येताच कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी व्यासपीठावरुन भाषण केलं. त्यात त्यांनी राजनाथ सिंह यांच्या विधानाचा उल्लेख केला. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला जाहिए,' असं दिपके म्हणाले. 'एनडीए



सरकारमध्ये मंत्र्यांचे राजीनामे होत नाहीत, असं राजनाथ सिंह एकदा म्हणाले होते,' याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली.

राजनाथ सिंह यांचं विधान कायम चर्चेत असतं. नवी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत बोलताना राजनाथ सिंह मंत्र्यांच्या राजीनाम्यावर बोलले होते. 'मंत्र्यांचे राजीनामे घेतले जात नाहीत. हे यूपीए सरकार नाही. हे एनडीए सरकार आहे. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा. आमचे मंत्री ती कामं करत नाहीत, जी कामं त्यांचे मंत्री करत होते,' असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं होतं. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर राजनाथ सिंह यांचं विधान पुन्हा एकदा व्हायरल झालं आहे. सोशल मीडियावर राजनाथ सिंहांनी ट्रोल केलं जात आहे.

एक्सवर अनेकांनी राजनाथ सिंह यांच्या विधानाची क्लिप टाकून त्यांची खिल्ली उडवली आहे. 'हे यूपीए सरकार नाही, एनडीए सरकार आहे. इथे मंत्री राजीनामे देत नाहीत, असं तुम्ही म्हणाला होतात. मग आता राजीनामा कोणी दिला?', असा प्रश्न सुरभी नावाच्या एक्स यूजरनं विचारला आहे. तर वीणा जैन नावाच्या एका यूजरनं, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा भाजप सरकारच्या पतनाची सुरुवात असून २०२९ मध्ये सरकारचा अंत होईल, अशी भविष्यवाणी केली आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून विठ्ठल-रखुमाईची सपत्नीक शासकीय महापूजा
### पंढरपूर मंदिर कॉरिडॉर उभारणार, वारकऱ्यांना आषाढीची भेट

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची सपत्नीक शासकीय महापूजा केली. महाराष्ट्रावर विठूमाऊलीची कृपादृष्टी सदैव राहो, राज्यात सुख-समृद्धी नांदो, शेतकरी सुखी-समृद्ध होवो आणि जनतेच्या जीवनात आनंद आणि समाधान लाभो, अशी प्रार्थना त्यांनी विठूमाऊलीच्या चरणी केली.



**मोदींनी सुरु केलेल्या विकासाला बळ मिळो...**

पंतप्रधाान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या तरुणाईसाठी सुरु केलेल्या विकास आणि नव्या संधींच्या प्रवासाला अधिक बळ मिळावे, प्रत्येक युवक-युवतीच्या आशा-आकांक्षा पूर्ण व्हाव्यात आणि विकसित भारताच्या निर्मितीचा संकल्प अधिक वेगाने साकार व्हावा, यासाठीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठल-रखुमाईच्या चरणी प्रार्थना केली.

**माने दाम्पत्य मानाचे वारकरी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पंढरपूर येथे मानाचे वारकरी दाम्पत्य बाळासाहेब माने आणि श्रीमती प्रभावती माने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आले.

**वारीने नवा उच्चांक गाठला !**

यंदा वारीने नवा उच्चांक गाठला असून २५ किलोमीटरपेक्षा अधिक अंतरापर्यंत भाविकांची रांग लागली. मात्र सर्व भाविकांची अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्था करण्यात आली आहे. विठ्ठल नामाचा गजर करत भाविक दर्शन घेत आहेत. जगाच्या पाठीवर असा आनंदाचा सोहळा दुसरा कुठेही नाही, जिथे कोणत्याही निमंत्रणाशिवाय लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अशा भावना यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

**पंढरपूर मंदिर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात करणार**

पंढरपूर येथे भगवान श्री पांडुरंगाच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता अधिक प्रशस्त परिसर आणि आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे काळाची गरज आहे. त्यादृष्टीने यावर्षीच पंढरपूर मंदिर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात करण्यात येणार असून, ते पूर्ण झाल्यानंतर दर्शन व्यवस्था अधिक सुलभ, सुव्यवस्थित आणि सुरळीत होईल. अशी आशाही फडणवीसांनी व्यक्त केली.

वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलसेवा मानत राज्य शासनाने यंदा शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि मोफत वीज देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. त्यांच्यासह मंत्री गिरीश महाजन, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री आकाश फुंडकर, आमदार समाधान आवताडे, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ राहुरी शहर कडकडीत बंद !

**अक्षराज : प्रमोद डफळ**



**दि.२५, राहुरी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ राहुरी शहरात शुक्रवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते व नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होत विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध व्यक्त केला. सकाळी राजवाडा परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर लक्ष्मीनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. पुढे मोटारसायकल रॅलीद्वारे शहरातून फेरी काढण्यात आली. रॅलीनंतर ज्ञानी चौक येथील संविधान स्तंभास अभिवादन करून सभा घेण्यात आली.

सभेत वक्त्यांनी दिल्लीतील घटनेचा तीव्र निषेध नोंदवत विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज हा लोकशाही मूल्यांवर आघात असल्याचे सांगितले. तसेच या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, जिल्हा संपर्कप्रमुख पिंटू नाना साळवे, जिल्हा प्रवक्ते अनिल जाधव, शहराध्यक्ष ऋषिकेश साळवे, तालुका उपाध्यक्ष गणेश पवार, तालुका संपर्कप्रमुख नागेश जाधव यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आदिवासी संघर्ष सेना तसेच इतर संघटनांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला.

दरम्यान, राहुरी शहरातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आंदोलनास प्रतिसाद दिला. त्यामुळे शहरात दिवसभर कडकडीत बंदचे चित्र पाहायला मिळाले. शेवटी संविधानाचे वाचन करून आंदोलनाची सांगता करण्यात आली.

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ६२३ कोटी १७ लाख रुपयांची कर्जमुक्ती...

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२५, चंद्रपूर :** राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही ऐतिहासिक योजना आहे, असे सांगत चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी तब्बल ६२३ कोटी १७ लक्ष रुपयांची कर्जमुक्ती होणार असल्याची माहिती माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसंदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शेतकऱ्यांची ऐतिहासिक कर्जमुक्ती करण्याचा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असल्याने शेतकऱ्यांच्या वतीने मुनगंटीवार यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयाचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेत ५० हजार रुपयाचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करुन वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीजबील आकारले जात नाही. मात्र, त्यांची वीज वापराची ४८ हजार कोटींची जुनी थकबाकीही आता माफ केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी घोषित केल्याने राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या थकीत वीज बिलाची पाटी पूर्णपणे कोरी होणार आहे, असेही यावेळी मुनगंटीवार यैंनी सांगितले. यावेळी महापौर संगीता खांडेकर, राजेंद्र गांधी, राहुल पावडे, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरीष शर्मा, डॉ. मंगेश गुलवाडे, माजी आमदार प्रा. अतुल देशकर, ब्रीजभूषण पाझारे उपस्थित होते.

## उपायांवर करडी नजर ठेवू! 'नीट-यूजी' पेपरफुटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नवी दिल्ली :** 'नीट-यूजी' परीक्षांमध्ये भविष्यात पेपरफुटीच्या घटना होऊ नयेत, यासाठी या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांवर करडी नजर ठेवली जाईल,' असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले; तसेच गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला तदर्थवाद (ॲड हॉकिझम) हेच या समस्येचे मूळ कारण असल्याची टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने केली. अखिल भारतीय वैद्यकीय संघटना महासंघासह (एफएआयएमए) अनेकांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक अराधे यांच्या खंडपीठाने केंद्राने राधाकृष्णन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी, परीक्षेतील पारदर्शकता आणि आयआयटी प्रारूप याबद्दल नेमकी काय पावले उचलली गेली याची सविस्तर माहिती द्यावी, असे निर्देश दिले.

पुढील वर्षापासून नीट-यूजी संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा विचार असून, यासंदर्भातील कार्यपद्धती (एसओपी) विद्यार्थ्यांसमोर वेळेआधी मांडावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली. सुमारे २२ लाख विद्यार्थी 'सीबीटी' पद्धतीने परीक्षा देणार असल्याने त्यांना सराव चाचण्या उपलब्ध करून द्याव्यात, असेही न्यायालयात नमूद करण्यात आले. हे प्रकरण तीन ऑगस्टपर्यंत तहकूब करताना, परीक्षाप्रक्रियेचे पूर्ण संस्थात्मककरण व्हावे आणि पेपरफुटीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी न्यायालय वर्षभर या प्रकरणावर लक्ष ठेवेल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

**२७ जुलैला सुनावणी !**



> गेल्या दोन दिवसांपासून पूर्णतः खोट्या बातम्या प्रसारित होत आहेत. सरन्यायाधीशांनी तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला असे चुकीचे वार्तांकन करण्यात सर्व बेजबाबदार प्रसारमाध्यमे मुक्त आहेत.
> **– सूर्य कांत, सरन्यायाधीश**

पेपरफुटी; तसेच इतर परीक्षांमधील अनियमितता यासंदर्भात आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांवर होणाऱ्या पोलिसी अत्याचारांसंदर्भात दोन स्वतंत्र याचिकांवर सोमवारी, २७ जुलै रोजी सुनावणी घेण्याची तयारी सर्वोच्च न्यायालयाने दाखवली आहे. सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी याचिकाकर्त्यांतर्फे युक्तिवाद करताना पोलिस विद्यार्थ्यांवर अत्याचार करत असून या घटना वरचेवर घडत असून यासंदर्भातील याचिका सुनावणीस घेतल्या जाव्यात असे सांगितले. त्यावर सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने त्यावर सोमवारी सुनावणीची तयारी दर्शवली.

**माध्यमांमधील त्या बातम्या तथ्यहीन : सरन्यायाधीश**

'कॉक्रोच जनता पक्षाच्या आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसी अत्याचाराच्या कृत्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी करण्यास नकार दिल्याच्या बातम्या निखालस खोट्या, अविवेकी आणि तथ्यहीन आहेत,' अशी स्पष्टोक्ती सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केली आहे. 'ती याचिका नव्हती केवळ सादरीकरण होते,' असे ते म्हणाले. कॉक्रोच जनता पक्षाच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार देतानाच आमचा वेळ वाया घालवू नका, असे सरन्यायाधीश म्हणाल्याचे वृत्त दोन दिवसांपूर्वी देशभरातील माध्यमांमध्ये प्रसारित झाले होते. त्यावर सरन्यायाधीशांनी शुक्रवारी खुलासा केला.

'मिश्रा का कोणीतरी वकिलाने त्याचे केवळ सादरीकरण केले होते. त्यांनी त्यांच्याकडे पोलिसी अत्याचाराच्या ध्वनिचित्रफिती असल्याचे सांगितले. त्या पाहून या संदर्भातील याचिका पुढील दिवशी सादर करू शकतो का, अशी विचारणा वकिलांनी केली. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी आल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, केवळ सादरीकरणाला रिट याचिका कसे संबोधू शकतो, असे मी विचारले. त्यातून माध्यमांनी सोयीस्कर अर्थ काढला,' असे सूर्य कांत म्हणाले.




## दोन आंदोलने

दिल्लीच्या जंतर मंतरवर कधीही गेलं तरी, 'गांधीजी का जंतर' हा प्रसिद्ध वाक्प्रचार आठवतो. अण्णा हजारे आंदोलनानंतरचं एक मोठं आंदोलन सध्या इथं सुरू आहे ते 'नीट' पेपरफुटीवरून शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी, कॉक्रोच जनता पक्षाचे (सीजेपी) अभिजित दीपके व सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली. हे आंदोलन आता अखेरच्या टप्प्यात आल्याची चाहूल लागली. अशा वेळी इथं रात्रीच्या वेळी गेलं की, जंतरमंतरचं वेगळंच रूप दिसतं. गेले ३५ दिवस जंतरमंतरवरच्या गर्दीची रात्रीची झोप हरवली आहे. पिवळट प्रकाश सांडणाऱ्या दिव्यांच्या आडून छद्मीपणे डोकावणारा अंधार असला तरी हजारो तरुणांच्या डोळ्यांत आशेचा उजेड पेटलेला असतो. कुणाच्या हातांतला तिरंगा हवेवर फडकत असतो, कोणाच्या हातात फलक. गर्दीच्या ओठांवर घोषणांचा अखंड नाद पोलिसांचे जत्थे बॅरिकेड्सच्या मागून बारकाईने गर्दीकडे पाहत असतात. रात्री साडेबारा, दोन, तीन आणि चार वाजतात; पण आंदोलनाची धग कायम असते. बाजूच्या पदपथांवर विश्रांती घेणारे आणि मंचासमोर घोषणा देणारे कार्यकर्ते हे चित्र लोकशाहीतल्या जनआंदोलनाचं वेगळं रूप. पहाटेची आभा पसरत असताना पोलिस, निमलष्करी जवानांची संख्या वाढत जाते, दंगाविरोधी पोलिसी वाहनांचा गराडा पडतो. हेल्मेटधारी जवान आपापल्या जागा घेतात आणि जंतरमंतरचं रूप एका सुरक्षाकवचात अडकलेल्या आंदोलनस्थळात बदलतं. सुरक्षा कडक होत चालली, निशस्त्र विद्यार्थ्यांवर लाठ्याकाठ्या चालल्या, व्यवस्थेनं मेट्रो स्थानकं एकामागून एक बंद करून पाहिली, काही समाजकंटक प्रवृत्तींनी याआडून हात साफ करून घेण्याचे प्रयत्न चालवलेत.

'सीजेपी'च्या या आंदोलनात जेव्हा जेव्हा जंतरमंतरवरचं दृश्य पाहिलं, तेव्हा तेव्हा मनात पंधरा वर्षांपूर्वीच्या अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या आठवणी जाग्या झाल्या. त्या आंदोलनाचंही वार्तांकन करण्याचा अनुभव आगळावेगळाच होता. जंतर मंतर आणि रामलीला मैदान या दोन्ही ठिकाणी तेव्हा देशभरातून आलेल्या जनसमुदायाने भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला होता. २०११ मध्ये अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालचं आंदोलन मुख्यतः भ्रष्टाचाराविरोधातील नैतिक लढा म्हणून उभे राहिलं होतं. तेव्हाचं यूपीए सरकार अगदीच घायकुतीला आलं होतं आणि राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा घोटाळा, २जी स्पेक्ट्रम प्रकरण, आदर्श घोटाळा यांमुळे तरुणांच्या मनात संताप होता. 'महापुरे झाडे जाती,..'अशी मराठीमिश्रित हिंदी बिनदिक्कत बोलणाऱ्या अण्णांचं साधं व्यक्तिमत्त्व आणि गांधीवादी उपोषणानं जनतेच्या मनातल्या त्या संतापाला दिशा दिली. सध्याच्या आंदोलनात उत्साह आहे, पण एक अस्वस्थताही आहे. हजारो पोलिस, बॅरिकेड्स, सीसीटीव्ही, निमलष्करी दलांचा बंदोबस्त आणि निर्बंध यांमुळे आंदोलनाचे स्वरूप अधिक संघर्षमय आहे. संवादापेक्षा करकचून नियंत्रणाला अधिक महत्त्व दिल्याची जी भावना आंदोलकांमध्ये दिसते, ती आपल्यालाही जाणवते.

सामाजिक व्याप्ती हा दोन्ही आंदोलनांतील आणखी एक महत्त्वाचा फरक. अण्णा आंदोलनानं भ्रष्टाचार हा जणू प्रत्येक नागरिकाचा प्रश्न बनवला होता. त्याआधी जणू देशात भ्रष्टाचार झालाच नव्हता, असं काहीतरी लोकांना वाटत असावं. सध्याचं आंदोलन शिक्षण, परीक्षा, रोजगार, पर्यावरण किंवा विशिष्ट धोरणांशी संबंधित प्रश्नांपासून सुरू झालं व नंतर त्यात इतर मुद्दे जोडले गेले. त्यामुळे त्याला सहानुभूती मोठ्या प्रमाणात मिळाली असली, तरी २०११ सारखी सर्वसमावेशक राष्ट्रीय लाट निर्माण करण्याची ताकद यात नाही. २०११मध्ये सरकारविरोधी सर्वव्यापी संताप स्पष्ट जाणवत होता, सध्या त्या प्रमाणात तशी भावना नाही. मुळात या आंदोलनाला सध्याच्या सरकारनं परवानगी दिलीच कशी, हा प्रश्न सूज्ञांना पडला नाही तर देव त्यांचं रक्षण करो! अर्थात टोकाचा व्यक्तिद्वेष असेल तर बोलणंच खुंटलं.

मात्र, तरुणांचा मोठा सहभाग ही एक गोष्ट दोन्ही आंदोलनांना समान धाग्याने जोडते. विदेशी माध्यमांत प्रसिद्धी पण ताज्या आंदोलनावर बहुतांश राष्ट्रीय प्रमुख प्रसार माध्यमांचा अघोषित बहिष्कार,असं चित्र असलं तरी जंतरमंतरवर रात्ररात्र जागणारे, सोशल मीडियावर थेट प्रक्षेपणाच्या व संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळणारे बहुसंख्य युवकच आहेत. दोन वेगवेगळ्या आंदोलनांत तरुणच आंदोलनाचे प्रमुख चेहरे का बनतात? कोणत्याही देशातला तरुण हा असा घटक असतो ज्याला आपल्या भविष्याबाबतची सर्वाधिक असुरक्षितताही भेडसावत असते. २०११ मध्ये भ्रष्टाचाराम ुळे संधी हिरावल्या जात आहेत अशी भावना तरुणांमध्ये होती. आज त्या भावनेची जागा शिक्षणातील बजबजपुरी, स्पर्धा, नोकरी आणि करिअरच्या अनिश्चिततेने घेतली आहे. २०२६च्या सात महिन्यांत १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवकांमधील बेरोजगारी सुमारे ५.५ ते १५ टक्के आहे. उच्च शिक्षण घेऊनही योग्य रोजगार न मिळणे, स्पर्धा परीक्षांतील अनिश्चितता, भरती प्रक्रिया लांबणे, परीक्षा रद्द होणे किंवा प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना यामुळे तरुणांच्या मनात व्यवस्था त्यांच्या भविष्याबद्दल गंभीर नाही, अशी भावना आहे. सरकार एखाद्या आंदोलनाकडे केवळ एका घटनेची प्रतिक्रिया म्हणून पाहू लागलं तर मूळ प्रश्न समजण्यात गल्लत होऊ शकते. जंतर मंतरची जागती रात्र एक सांगावा जरूर देते की अंधार कितीही गडद असला, तरी पहाटेची चाहूल नेहमी जाग्या असणाऱ्या मनांनाच आधी लागते.

**– मंगेश वैशंपायन**

# आधारहीन संदेश फॉरवर्ड करु नका !

आषाढी एकादशीपासून चातुर्मास सुरु होतो. या ४ मासाच्या कालावधीत रज -तमाचे प्रमाण वाढत असल्याने मनुष्याने व्रतस्थ राहावे, असे धर्मशास्त्र सांगते. त्यासाठीच या कालावधीत ऋषी मुनींनी अनेकविध व्रतांची आणि सणांची योजना केली असावी.

एकूणच मानवाच्या कल्याणासाठी आपल्या पूर्वजांनी केलेले हे प्रयोजन माणसांतील भेदभाव, भांडणे विसरायला लावून त्यांना एकत्र येण्याची आणि आनंद मिळवण्याची शिकवण देणारे आहे. गेल्या काही वर्षांत मात्र सण जवळ आले कि त्या सणांची टिंगलटवाळी करणारे विडंबनात्मक संदेश सामाजिक प्रसारम ाध्यमांतून फिरू लागतात. व्हाट्सअप, फेसबुक आणि इंस्टाग्रामवर आपला बहुतांश वेळ खर्च करणारा आधुनिक वर्ग एखादा विनोद फॉरवर्ड करावा तसे हे संदेश फॉरवर्ड किंवा शेअर करत असतात. यांतील काही संदेश तर सण आणि व्रतवैकल्यांमागील अध्यात्मशास्त्र विचारात न घेता केवळ बुद्धीभेद करण्याच्या उद्देशाने निर्माण केले गेलेले असतात ज्यांना तर्कशास्त्राचाही आधार नसतो.

अशा संदेशांमुळे सश्रद्ध भाविकांच्या श्रद्धेला तडा जातो. प्रत्येक सणामागे आणि तो कसा साजरा करावा यामागे जसे आध्यत्मिक कारण असते तसा त्याला वैज्ञानिक आधारसुद्धा असतो. समाजातील लहान मोठ्या व्यावसायिकांचे अर्थकारण या सण उत्सवांच्या माध्यमातून जपले जाते. अनेकांना ते ज्ञात नसल्याने असले निरर्थक संदेश फॉरवर्ड करून आपणच आपल्या धर्मशास्त्राची अवहेलना करत असतो. नास्तिक विचारसरणीच्या मंडळींकडून असले बुद्धिभेद करणारे संदेश तयार केले जातात; मात्र ते फॉरवर्ड आणि शेअर करून समाजात पसरवण्याचे काम दुर्दैवाने सश्रद्ध मंडळीच करत असतात. विशेष म्हणजे केवळ हिंदू सणांच्या बाबतीतच असले प्रकार घडतात. त्यामुळे यंदापासून जागरूक राहून असे संदेश इतरांना फॉरवर्ड करणे टाळूया.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# ठाकरे बंधुच तिरंगा जनआंदोलन..!!

नीट पेपरफुटी आणि परीक्षातील अनागोंदीविरोधात दिल्ली-मुंबईत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस दडपशाहीच्या निषेधार्थ शिवसेना (उबाठा) प्रम ुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी आज संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. शिवाजी पार्क ते प्रभादेवीतील सिद्धिविनायक मंदिरापर्यंत निघणारा हा मोर्चा केवळ एका आंदोलनापुरता मर्यादित नसून संतप्त विद्यार्थ्यांच्या मनातील उद्रेकाला वाट मोकळी करून देणारा असेल. पक्षीय झेंडे बाजूला ठेवून हातात केवळ 'तिरंगा' घेण्याचे आवाहन करून या दोन्ही भावांनी या लढ्याला राजकीय रंगाऐवजी 'जनआंदोलन' आणि 'विद्यार्थ्यांचा आक्रोश' असे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी केवळ दोन्ही पक्षांचे नेतेच नाही तर अगदी भाजपच्या कुठल्याही नेत्याला या मोर्चात सहभागी व्हायचे असेल, तरी त्यांचे स्वागत आहे, अशी भूमिका दोघांनी ठेवली आहे, हे महत्त्वाचे म्हणावे लागेल. वर्षानुवर्षे दिवस-रात्र एक करून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कुठलीही परीक्षा त्यांच्या भविष्याची आणि कुटुंबाच्या आशा-आकांक्षांची लढाई असते. परंतु, म ागील काही वर्षांमधील पेपरफुटीच्या विविध घटनांमुळे या पारदर्शक प्रक्रियेला तडे गेले आहेत. गुणवंत आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांमध्ये आपल्यावर घोर अन्याय होत असल्याची भावना बळावत चालली आहे. या अन्यायाविरोधात जेव्हा तरुण रस्त्यावर उतरले, तेव्हा त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी दिल्ली आणि मुंबईत आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेली कारवाई अत्यंत संतापजनक होती. लोकशाहीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे हा



रविवार विशेष.. कव्हर स्टोरी!

प्रत्येकाचा घटनात्मक अधिकार आहे. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्लीत लाठीचार्ज होणे, त्यांना अम ानुष पद्धतीने मारहाण होणे यामुळे सरकारच्या संवेदनशीलतेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांना लाठ्याकाठ्यांनी, काठीला खिळे लावून म ारले, त्यांचे कपडे फाडले. न्यायालयाला कुत्रे, कबुतरांच्या विषयाकडे लक्ष द्यायला वेळ आहे, मात्र विद्यार्थ्यांना झालेल्या मारहाणीकडे लक्ष द्यायला वेळ नाही, हे अतिशय दुर्दैवी म्हणावे लागेल. सध्या न्यायालयाची परिस्थितीसुद्धा धृतराष्ट्रासारखी झाली असून द्रौपदीने धृतराष्ट्राकडे न्याय मागण्यासारखे झालेले आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा विषय केवळ नीटपुरता मर्यादित राहिलेला नाही. गेल्या काही वर्षांचा राग आता उफाळून आला आहे. याच दडपशाहीच्या विरोधात ठाकरे बंधूंनी एकत्र येत विद्यार्थ्यांना मानसिक पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे.

जेव्हा जेव्हा महाराष्ट्राच्या किंवा मराठी माणसाच्या अस्मितेचा विषय येतो, तेव्हा दोन्ही ठाकरे बंधू आपले मतभेद विसरून एकत्र आल्याचा इतिहास आहे. राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा

निर्णय घेतला होता, तेव्हा या दोन्ही भावांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून या निर्णयाला जोरदार विरोध दर्शवला होता. मराठी भाषेच्या आणि अस्मितेच्या रक्षणासाठी दोन्ही ठाकरे एकत्र आले. ठाकरी दणक्यामुळे सरकारला या निर्णयावर चार पावले मागे जावे लागले. त्या एका मोर्चाने महाराष्ट्राच्या राजकारणालाही नवी दिशा दिली. या एकत्रिकरणानंतर पार पडलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये जरी कोणत्याही महापालिकेत थेट सत्ता स्थापन करता आली नसली, तरी ठाकरे बंधूंच्या युतीमुळे मराठी मतांचे ध्रुवीकरण थांबले. आता पुन्हा एकदा, विद्यार्थ्यांच्या मुद्द्यावर दोन्ही भाऊ एकत्र मोर्चा काढत आहेत. आजचा तरुण हा बेरोजगारी, महागाई आणि शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराने होरपळत आहे. पेपरफुटीच्या घटनांमुळे तरुणांम धील सरकारविरोधातील असंतोष शिगेला पोहोचला आहे. जेव्हा जेव्हा समाजात असा आक्रोश निर्माण होतो, तेव्हा त्याला योग्य दिशा देण्यासाठी खंबीर नेतृत्वाची गरज असते. सध्या दादरच्या शिवाजी पार्कसह मुंबईतील वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमून तरुणाई दररोज आपला आक्रोश व्यक्त करत आहे. त्यामुळे रविवारी शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर या मार्गावर निघणारा हा मोर्चा तरुणांच्या मनात साचलेल्या रागाला लोकशाही मार्गाने बाहेर पडण्यास मार्ग मिळवून देईल. या आंदोलनातून मिळणारी ऊर्जा महाराष्ट्रातील तरुणांना आपल्या हक्कांबद्दल अधिक जागरूक करेल आणि सरकारलाही जनभावनेची दखल घेण्यास भाग पाडेल, अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्रात ठाकरे बंधूंच्या मोर्चाची चर्चा असताना राजधानी दिल्लीतही अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. ज्येष्ठ विचारवंत आणि समाजसेवक सोनम वांगचुक यांनी २६ व्या दिवशी आपले उपोषण सोडले आहे. यामुळे जंतर-मंतरवरील आंदोलन संपणार का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता, परंतु केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय माघार नाही, यावर आंदोलक ठाम आहेत. त्यातच सीजेपी आणि केंद्र सरकारमध्ये पुन्हा एकदा संवाद सुरू झाला आहे. काही मागण्यांवर सरकार सकारात्म क असल्याचे म्हटले जात आहे. लोकशाहीत संवादाची दारे उघडी राहणे हे सकारात्मक लक्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रात्री उशिरा सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करून पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदे आणि उपाययोजना अंमलात आणण्याचे आश्वासन दिले आहे. या सर्व घडामोडींवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, जेव्हा जनता शांततापूर्ण मार्गाने आणि ठामपणे आपले प्रश्न मांडते, तेव्हा सरकारला नमते घ्यावेच लागते. रविवारी मुंबईत निघणाऱ्या संयुक्त म ोर्चाआधीच काही सकारात्मक गोष्टी घडल्यास हा मोर्चा विजयी मोर्चाही ठरू शकेल. काही का असेना या मोर्चाच्या माध्यमातून ठाकरे बंधूंचे पुन्हा एकत्र येणे, तरुणाईला साद घालून त्यांचा आवाज बनणे या गोष्टी महाराष्ट्राच्या आगामी राजकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या ठरू शकतील.

**– ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

## पॅटर्न

एखादा पॅटर्न गाजो
किती कोड कौतुक
नगारा वाजवत राहे
दिसे सकला कर्तुक

काय असे नियोजन
जाणाय सारे उत्सुक
गवगवा चालत जाई
अनुभवे भरते संदूक

अंधविश्वास ठेवतात
कुणीकधी रे सहेतुक
यशस्वी करता पॅटर्न
प्रसिद्धीदेई आपसूक

फळ मिळे प्रयत्नांना
विद्यार्थी होई भावूक
एकामागे अनेकजथे
प्रवेश होतात घावूक

कालांतराने कुठेतरी
उघडकीस येता चूक
सत्यभ्रमात फारकत
सहज होई चुकामूक

आपल्याचं छातीवर
आपणरोखतो बंदूक
दूर दृष्टी दूर निघाली
दिसाया लागे अंधूक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# पाणी आडवा पाणी जिरवा मोहीम राबविणे जरुरीचे

यंदा मान्सून तसा उशिरा सुरु झाला. म ध्य महाराष्ट्रात गेले काही दिवस पाऊस पडत आहे. तथापि अजूनही महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस पुरेसा झालेला नाही. गेले काही वर्षातीलपावसाचे चित्र पाहिल्यास आपणास असे दिसते कि पाऊस एकदम जास्त किंवा जोराचा पडतो पूर्वी जून महिन्यात पहिल्या आठवड्यात पावसाळा सुरुवात ही होत असे.

आज मात्र जुलै महिना संपत आला तरीही काही भागात पाऊस झाला नाही किंवा जेथे झाला तेथे तो पिकांना पुरेसा नाही आता यावर पाणी जिरवा पाणी आडवा माहीम जोराने राबविणे जरुरीचे आहे. आज कोयनेसारख्या धरणातून दरवर्षी मोठ्या प्रमाणातून विसर्ग करावा लागतो. हे आपणास टाळून त्याचा उपयोग शेतीला करणे शक्य करावे असे वाटते. शेतात शेततळी किंवा खड्डे तयार करणे हे काम हाती घेता येईल.

महाराष्ट्रात शेतातली तळी बऱ्याच शेतकऱ्यांनी बांधली आहेत. राहिलेल्या शेतकऱ्यांनी ती बांधावीत अशी अपेक्षा आहे. लहान नद्यांवर बंधारे बांधून पाणी अडवावे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी ही वृक्षरोपणाची



मोहीम तीव्र करावी यामुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविता येते --आज म हाराष्ट्रात देशातील जास्तीत जास्त धरणे आहेत. तरी सुद्धा काही भागात पाऊस संपल्यानंतर ट्रॅक्टर चालू करावे लागतात. असे उपाय योजल्यास विहिरीतील पाण्याची पातळी वाढते.

पाण्याचा पुरवठा कायम वर्षभर मिळू शकतो. शेतीसाठी व जनावरांना पाणी उपलब्ध होते. तसेच उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवत नाही. महाराष्ट्रात यातील बरेच उपाय केलेले आहेत तथापि अजूनही पाण्याची टंचाई आहे. तेव्हा जेव्हा पाऊस पडत आहे तेव्हा त्याचे पाणी अडविणे व जिरविणे जरुरीचे आहे. दिवसेंदिवस पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात व वाढत चालला आहे. त्यावर मत करावयाची असल्यास जोराने राबविणे जरुरीचे आहे.

**– शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# विठ्ठल-रुक्मिणीच्या शासकीय महापूजेचा मान कळंब तालुक्यातील गौरगावच्या माने दाम्पत्याला



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२५, (धाराशिव) :** एकादशीनिमित्त पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणीच्या शासकीय महापूजेचा मान आपल्या धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव चे बाळासाहेब माधव माने व प्रभावती बाळासाहेब माने या वारकरी दांपत्याला मिळाला. मागील २० वर्षांपासून अखंड पंढरीची वारी करणारे माने दांपत्य यांच्या कुटुंबातील तिसऱ्या पिढीचे वारकरी आहेत.त्यांच्या निस्सीम भक्तीचा आणि वारकरी परंपरेप्रति असलेल्या समर्पणाचा हा सन्मान आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या समवेत माने दांपत्याचे विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केले. महापूजा नंतर मुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य सर्व परिवहन महामंडळाकडून (एसटी) यांना वर्षभरासाठी मोफत प्रवासाचा पास प्रदान करण्यात आला. माने दांपत्याचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या या सन्मानामुळे गौरगाव, कळंब आणि संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# आषाढी एकादशीला खापरखेडा परिसरात अवतरली पंढरी

## दिंडी यात्रेत अनेक दिंड्या व भजन मंडळांचा सहभाग



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** नाम विठ्ठलाचे घेऊ, सारे वाळवंटी जाऊ, दिंडी आली दारावरी, चला पंढरीला जाऊ या विठ्ठलाच्या भजनाचे नामसमरण करून दिंडी यात्रेत टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत खापरखेडा परिसरातील शेकडो वारकरी बंधू भगिनीनी शनिवार, दि.२५ जुलै २०२६ देवशयनी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी केली.याप्रसंगी दिंडी यात्रेत वारकऱ्यांचे भजन मंडळ व दिंड्या सामील झाल्या होत्या त्यामूळे खापरखेडा परिसरात पंढरी अवतरल्याचे जाणवत होते. खापरखेडा परिसरात देवशयनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे वारकरी बांधवांच्या वतीने दिंडी यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

दिंडी यात्रेत परिसरातील भजन मंडळ व दिंड्या सहभागी झाल्या होत्या. वारकरी टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत विठू माझा लेकुरवाळा, पाहुले चालती पंढरीची वाट, विठू माहुली तू माहुली जगाची, विठ्ठल आवडी प्रेमभावे, विठ्ठलाच्या पायी वीट झाली भाग्यवंत अशी एकापेक्षा एक सरस भजने म्हणून वारकरी बंधू भगिनींनी परिसर दणाणून सोडला होता.हनुमान मंदिर रेल्वे चौकी वार्ड क्रमांक १, राम मंदिर प्रकाश नगर वसाहत, नविन बिना हनुमान मंदिर, उपासे ले आउट, शिक्षक कॉलनी, साई मंदिर व हनुमान मंदिर भानेगाव, जय दुर्गा मंदिर नविन बिना, हनुमान मंदिर आदी परिसरात दिंडी यात्रेचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वारकरी बांधवांनी रिंगण तयार करून विठ्ठल नामाचे स्मरण केले.

दिंडी यात्रेत शांताराम गावंडे, रविंद्र चिखले, आनंदराव निंबाळकर, श्यामराव सरोदे, रामेश्वर ढोके, डोमा निखाडे, आनंदराव राजूरकर, सचिन नागरकर, क्रिष्णा चिकनकर, वसंता ढोके, शंकर बोढे, भोजराज लांजेवार, राजू उनपाने, निळकंठ शिंदूरकर, नथ्थु वांढरे, देवराव शिंदूरकर, शांताबाई चिखले, इंदूबाई चिकनकर, मंदाबाई निखाडे, गीता जालंदर, सुशिला बेंबारे, सुशिला सरोदे, अर्चना चिकनकर, शिला जालंदर, बेबीबाई निखाडे, मनिषा येलमुले, रेखा पापडकर, विशाल निखाडे, अनिकेत शिंदूरकर, महेंद्र चटप, चेतन चिकनकर, मानव गारघाटे, पारस चिकनकर, संजय मस्कर, साहिल बेंबारे, संकेत पापडकर, तन्मय ढोके, यांच्यासह शेकडो वारकरी सामील झाले होते.

# आकुर्डी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी भक्तिमय वातावरणात संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पुणे :** कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका योगिता काळे म्हळसाकांत विद्यालयाची उप प्राचार्य सात्रज, पर्यवेक्षिका अभंग व चारुलता जोशी यांच्याहस्ते सरस्वती पूजन व माऊलीच्या पालखीचे पूजन करून दिंडीचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. दिंडीत विठ्ठल व रुक्मिणीच्या वेशातील विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक वारकरी वेशभूषेतील विद्यार्थी, आकर्षक सजवलेली पालखी, टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनाम संकीर्तन यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका दिपाली मोहिते यांनी विद्यार्थ्यांना पालखी सोहळ्याचे पारंपारिक महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी भारुड सादर केले. इयत्ता चौथीतील रिषभ कंक विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल आवाजात छान अभंग सादर केला. शाळेचे मुख्याध्यापिका योगिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनात भरली पंढरी, विठूचा गजर, ज्ञानबा तुकाराम विद्यालयातील शिक्षिका मोहिते व सर्व शिक्षक वृंद यांनी टाळ्यांच्या गजरात विठ्ठल भक्तीचे भजने घेण्यात आली. या भक्तिमय सोहळ्याला आलेल्या मान्यवर पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे उत्साहाने कौतुक केले. या वारकरी दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संत परंपरा, वारकरी संस्कृती, भक्ती, शिस्त, सामूहिकता आणि भारतीय संस्कृतीचे संस्कार प्रत्यक्ष अनुभवातून मिळाल्याने हा उपक्रम सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

# नीट पेपरफुटी आणि दिल्लीतील लाठीचार्जच्या निषेधार्थ खापरखेड्यात आक्रोश मोर्चा

## अनेक राजकीय व सामाजिक संघटन मोर्चात सहभागी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्जचे तीव्र पडसाद संपूर्ण देशात उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ तसेच नीट पेपरफुटी प्रकरणी विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस जबाबदार धरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी खापरखेडा परिसरात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या वतीने शनिवार, दिनांक २५ जुलै २०२६ रोजी भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.मोर्चात विद्यार्थी, युवक आणि शेकडो नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खापरखेड्यातील अन्नामोड आणि मुख्य बाजारपेठेतून मार्गक्रमण करत हा मोर्चा थेट खापरखेडा पोलीस ठाण्यात पोहोचला.




यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दुमदुमून टाकला.

याप्रसंगी दिल्ली पोलिसांच्या अमानुष कारवाईचा आणि नीट पेपरफुटीच्या भ्रष्टाचाराचा आंदोलकांनी तीव्र शब्दांत धिक्कार केला. आंदोलनाच्या शेवटी शिष्टमंडळाने खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांच्यामार्फत महामहीम राष्ट्रपतींना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. निषेध मोर्चा मध्ये कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडी, आरपीआय, आम आदमी पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), भारतीय बौद्ध महासभा, भारतीय अभियंता संघटना, जयभीम वॉरियर्स, युवा शासन आदी सामील झाले होते.यादरम्यान केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची बातमी आंदोलनस्थळी पोहोचली.

बातमी कळताच आंदोलकांमध्ये प्रचंड उत्साह संचारला. हा विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा आणि लोकशाहीचा मोठा विजय आहे अशी भावना उपस्थितांनी व्यक्त करत परिसरात एकच जल्लोष केला.आंदोलनात कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवींद्र चिखले, माजी उपसभापती राहुल तिवारी, विश्वजित सिंह, धनराज डेहरिया, सरपंच मीनाक्षी तागडे, कृष्णा गिऱ्हे, अजय सहारे, कपिल वानखेडे, बंडू चौरागडे, सुनील पांडे, दिनेश लोडेकर, वैभव येवले, शुभम वाहने, कविता मेश्राम, पृथ्वीराज बागडे, धीरज देशभ्रतार, रवी शेंडे, प्रशांत पाटील, शरद पाटील, सविता नारनवरे, किरण शेंडे, स्वाती फुलझेले, मनोहर डोंगरे, श्याम गजभिये, नरेश पाणतावणे, निशांत गेडाम, साहिल गिऱ्हे, पुरोषात्तम चांदेकर, साहिली नानवटकर, रुक्षित भौतकर, जयंत झिंगरे, सम्यक पौणीकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# ठाणे महापालिकेची धडक मोहीम; शहरातील १६५ अनधिकृत पोस्टर्स-बॅनर्स हटवले

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, दिवा (ठाणे) :** ठाणे शहराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत आज विविध प्रभाग समिती क्षेत्रांत एकूण १६५ अनधिकृत पोस्टर्स आणि बॅनर्स हटविण्यात आले.

**प्रभागनिहाय कारवाई**

महापालिकेचे उपायुक्त जितेंद्र निकम यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रभागनिहाय कारवाई पुढीलप्रमाणे झाली.

नौपाडा-कोपरी - १८, वागळे - ४, लोकमान्य-सावरकरनगर - ५, वर्तकनगर - १७, माजिवडा-मानपाडा - ३७, उथळसर - १, मुंब्रा - ५ आणि दिवा प्रभाग समिती क्षेत्रात ७८ अनधिकृत पोस्टर्स-बॅनर्स हटविण्यात आले.

**कायदेशीर कारवाई**

अनधिकृत जाहिरात फलक लावणाऱ्यांविरोधात महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. नौपाडा-कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात २ तर दिवा प्रभाग समिती क्षेत्रात ३ जणांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**१० दिवसात १८९९ वर कारवाई**

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले की, दि. १३ ते २३ जुलै २०२६ या कालावधीत शहरातील तब्बल १,८९९ अनधिकृत पोस्टर्स आणि बॅनर्स हटविण्याची कारवाई करण्यात आली आहे. ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे.

**नागरिकांना आवाहन!**

शहराची स्वच्छता आणि सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी नागरिकांनी तसेच संस्था, संघटनांनी जाहिरात फलक लावण्यापूर्वी आवश्यक परवानगी घ्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे. करा, कायमचा निचरा करा. स्मशानासाठी बाजूची जमीन संपादित करून मोबदला द्या. पक्का रस्ता, स्वच्छतागृह बांधा आणि अंत्यविधीचे साहित्य मोफत द्या अशी संतप्त मागणी शिळगावकर करत आहेत.

# श्री शिवाजी विद्यालयाच्या एनसीसी कॅडेट ची सुवर्ण कामगिरी

**अक्षराज : प्रतीनिधी**

**दि.२५, बुलढाणा :** दिनांक १४ जुलै ते २३ जुलै रोजी १३ महाराष्ट्र बटालियन खामगाव यांच्या वतीने CATC/TSC या १० दिवसीय कॅम्पचे आयोजन अमरावती येथे करण्यात आले होते. यामध्ये श्री शिवाजी विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कॅम्प दरम्यान विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २२ रायफल फायरिंग स्पर्धेमध्ये शाळेत विद्यार्थी कुणाला काळे यांनी अचूक निशाणा साधत सुवर्णपदक पटकावले. यानिमित्ताने दिनांक २५ जुलै २०२६ रोजी त्याचा व त्याच्या पालकांचा सन्मान करण्यात आला.

त्याचबरोबर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले कुणाल काळे याच्या या सुवर्ण यशासाठी एनसीसी अधिकारी श्री पालकर यांचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे प्राचार्य प्रमोद कावरे यांनी भुषवले प्रमुख उपस्थिती म्हणून समाजकार्यात सतत उल्लेखनीय कामगिरी करणारे उभाठा गटाचे नेते डी.एस लहाने हे उपस्थित होते. यांनी देखील गरीब एकलपाल्य गरजवंत व होतकरू विद्यार्थ्यांना शाळेचे पोशाख वाटप केले.

त्याचबरोबर शिवाजी अर्बन पतसंस्था यांच्याकडून ७ हजार



रुपये व माजी शिक्षक पंढरीनाथ वाघ यांच्याकडून ४ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा साठी मदत रुपी मिळाले. याबद्दल शाळेचे प्राचार्य कावरे यांनी मनस्वी आभार मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक प्रतिनिधी योगेश भोंडे, पर्यवेक्षक नितीन ढोमणे शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी श्री मांगे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री ढोमणे यांनी केले.

# आषाढी एकादशी दिनी लाखावर भाविकांची आळंदीत दर्शनास गर्दी

**अक्षराज : अर्जुन मेदनकर**

**दि.२५, आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात देवशयनी आषाढी एकादशी दिनी भाविकांनी श्रीचे दर्शनास हरीनाम गजर करीत रांगा लावून श्रींचे दर्शनास गर्दी केली. परिसरातून आलेल्या भाविकांनी श्रींचे संजीवन समाधीचे दर्शन घेवून नगर प्रदक्षिणा पूर्ण केली. परंपरेने श्रींचे पालखीची ग्राम प्रदक्षिणा हरिनाम गजरात, इंद्रायणी नदीला पूर आल्याने पान दरवाजा मार्ग बाधित झाला. भाविकांना गांधी रामवाड्यातील विकसित दर्शन बारीतून मंदिरात प्रवेश देण्यात आला.

भाविकांची इंद्रायणी नदीवर गर्दी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने अडथळे, दोरी लावून मज्जाव केला. नेहमी गर्दीने फुलले नदी घाट पोलीस प्रशासनाने भाविकांना नदी घाटावर जाण्यास रोखल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. नदी पूर आल्याने नदी परिसरात नेहमी सारखी वर्दळ रोखण्यासाठी उपाय योजना करण्यात आली होती. आपत्ती नियंत्रण कक्षासह नगरपरिषद कर्मचारी, पोलीस, सुरक्षा रक्षकांनी तसेच जीव रक्षकांनी नदी घाटावर दक्षता घेत गर्दी होऊ नये यासाठी परिश्रम पूर्वक काम काज पाहिले. तीर्थक्षेत्री इंद्रायणी नदीचे पाण्याने आचमन करीत स्थान महात्म्य जोपासण्यास काहीशी भाविकांना अडचण निर्माण झाली. आळंदी मंदिरातील प्रथा परंपरेचे पालन करीत एकादशी दिनी ब्रम्हवृंदांचे हस्ते श्रीची पूजा, आरती, दुधारती झाली. एकादशी दिनी श्रींना फराळाचा महानैवेद्य झाला. या प्रसंगी मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली होती. श्रींचे पालखीची नगरप्रदक्षिणे दरम्यान भाविकांनी रस्त्याचे दुतर्फा गर्दी करून दर्शन घेतले. परंपरेने हरिपाठावर आधारित कीर्तन सेवा चक्रांकित महाराज यांचे तर्फे रुजू होत आहे. या प्रसंगी आळंदी संस्थानचे मानकरी, पुजारी, सेवक, आळंदी ग्रामस्थ, वारकरी, भाविक उपस्थित होते. मंदिरातील दर्शन बारीत रांगा लावून भाविकांनी दर्शनास गर्दी करीत श्रीचे समाधी दर्शन घेतले. संत



ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम उत्साहात झाले. भाविकांच्या दर्शनासाठी प्रभावी नियोजन करण्यात आले होते. कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शन देण्याचे नियोजन झाले. या साठी आळंदी पोलिस, मंदिरातील सुरक्षा रक्षक, सेवक यांनी दर्शन बारीसह पोलीस बंदोबस्त नियोजन केले. आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे यांचे सह आळंदी पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलीस यांनी सुरक्षित, सुरळीत दर्शनबारीसह, वाहतुकीचे नियोजन परिश्रम पूर्वक केले. आळंदी संस्थानसह विविध सेवाभावी संस्था व्यक्ती यांनी भाविकांना विविध फराळ पदार्थ प्रसादाचे वाटप केले. यावेळी आळंदी मंदिराचे वतीने पिण्याचे पाण्यासह इतर व्यवस्था देखील करण्यात आल्या. ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिरात गावकरी भजन सेवा हरिनाम गजरात झाली. या वेळी माऊलींचे मानकरी ज्ञानेश्वर कुऱ्हाडे पाटील यांनी भाविक, ग्रामस्थ यांना फराळाचे महाप्रसाद वाटप केले. ग्रामदैवत श्री हजेरी मारुती आरती ग्रुप तर्फे श्रींची आरती हनुमान स्तोत्र, हनुमान चालीसा, पसायदान हरिनाम गजर जयघोष उत्साहात करण्यात आला. एकादशी निमित्त आलेल्या भाविक-वारकरी यांनी येथील मंदिर प्रदक्षिणा हरीनाम गजरात केली. प्रदक्षिणा मार्गावरून श्रींचे पालखीची हरिनाम गजरात ग्राम प्रदक्षिणा राम घाट मार्गे झाली. भाविकांची अनवाणी पायाने होणारी नगरप्रदक्षिणा प्रशस्त नगरप्रदक्षिणा मार्ग विकसित झाल्याने सुखकर झाली. एकादशी निमित्त आलेल्या भाविकांच्या वाहनांमुळे परिसरातील रस्ते वाहनांच्या गर्दीने फुलले होते.

# बोरी येथे आषाढी एकादशीनिमित्त भव्य पालखी मिरवणूक

**अक्षराज : जफर शेख**

**दि.२५, बोरी (परभणी) :** आषाढी एकादशीनिमित्त बोरी येथे पारंपरिक पद्धतीने भव्य पालखी मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. गावातील वारकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुम दुमून गेला.बोरीतील महादेव मंदिरापासून पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला. त्यानंतर ही मिरवणूक पेठ गल्ली, श्रीराम मंदिर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा महादेव मंदिरात येऊन सांगता झाली. संपूर्ण मार्गावर ग्रामस्थांनी उत्स्फ ूर्त प्रतिसाद देत पालखीचे स्वागत केले. मिरवणुकीत विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेची आकर्षक सजविलेली पालखी, टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन आणि ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषाने वातावरण भारावून गेले. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी आकर्षक लेझीमची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध ठिकाणी ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत करून वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, फराळ व प्रसादाचे वाटप केले. यावेळी साईकृपा शैक्षणिक संकुल, जिल्हा परिषद शाळा, ज्ञानोपासक विद्यालय तसेच प्रिन्स इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला.

पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी हरिनामाचा गजर करत मिरवणुकीची शोभा वाढविली. विविध शाळांतील विद्यार्थी एकत्र येऊन भक्तिभावाने सहभागी झाल्याने सामाजिक ऐक्य व संस्कारांचे सुंदर दर्शन घडले.यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अजय चौधरी, जिल्हा परिषद सदस्या दीपालीताई चौधरी तसेच अश्विनताई चौधरी यांनीही मिरवणुकीत उपस्थित राहून सहभाग नोंदविला. या भव्य



मिरवणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक दीपक करहाळे सर, प्राचार्य जावेद कुरेशी, शेख हारून सर, बोधले सर, चव्हाण सर, भारती सर, केशव सर, चौधरी सर, कल्याणी देशमुख, शिंपले मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले. मिरवणुकी दरम्यान सर्व सराफ सुवर्णकार बांधव तसेच डॉक्टर असोसिएशन यांच्या वतीने भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून सेवाभाव जपला.मिरवणुकीदरम्यान भाविकांनी विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन होत भक्तीभावाने सहभाग नोंदविला. गावातील विविध सामाजिक, धार्मिक संस्था तसेच ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा धार्मिक सोहळा शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या भव्य पालखी मिरवणुकीमुळे बोरी गावात आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि एकोप्याच्या वातावरणात साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# विंचूरच्या 'जय बजरंग मंडळ'च्या युवकांचा एक उपक्रम

## आळंदी ते पंढरपूर वारीत वारकऱ्यांसाठी मोफत चहा, फरसाण व सोनपापडीचे वाटप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५,विंचूर (नाशिक) :** श्री क्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर या पायी वारी सोहळ्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्राच्या विविध भागांतून लाखो वारकरी पांडुरंगाच्या भेटीसाठी पायी प्रवास करत आहेत. या भक्तीमय वातावरणात विंचूर येथील'जय बजरंग मंडळ ग्रुप'च्या युवकांनी एक अत्यंत कौतुकास्पद आणि सेवाभावी उपक्रम राबवून वारकऱ्यांची मने जिंकली आहेत.पायी चालणाऱ्या वारकऱ्यांचा थकवा दूर व्हावा आणि त्यांना ऊर्जा मिळावी या हेतूने जय बजरंग मंडळाच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण पायी दिंडी सोहळ्यात भाविकांसाठी मोफत गरमागरम चहा, चवदार फरसाण आणि गोड सोनपापडीचे वाटप केले.

**'पाऊले चालती पंढरीची वाट'... विंचूरच्या युवकांचा सेवाभाव**



आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता विठुमाऊलीच्या जयघोषात पायी प्रवास करतात. वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वरसेवाम ानून विंचूरच्या या तरुणांनी स्वतः वारीसोबत राहून दिवस-रात्र मेहनत घेतली. पहाटेच्या वेळी वारकऱ्यांना उत्साह देणारा गरमागरम चहा असो वा प्रवासात शक्ती देणारा नाश्ता, या युवकांनी अत्यंत नियोजनबद्ध रीतीने या उपक्रमाचे आयोजन केले.

**या कार्यकर्त्यांनी घेतले अहोरात्र कष्ट**

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय बजरंग मंडळ ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी मनस्वी मेहनत घेतली. यामध्ये मुख्यत्वे:नरेश परदेशी, कृष्णा सिरसाट, जगदीश रायजादे, निलेश महाले, पांडुरंग सोनवणे, पांगरकर मामा, करण घोडेराव, किरण देसाई, सुनील वाघ, कृष्णा महाले, दत्ता बोडकेया सर्व सदस्यांनी वारीतील भाविकांची सेवा करण्यासाठी मनापासून योगदान दिले. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या मुखातून आलेले आशीर्वाद हीच आमच्या या सेवेची खरी पावती आहे. जय बजरंग मंडळ ग्रुप, विंचूरविंचूरच्या या युवकांनी जपलेल्या सामाजिक व धार्मिक बांधिलकीचे आणि वारकरी सेवेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात लोकमान्य टिळकांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे नुकतेच लोकमान्य टिळक यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या प्रांगणात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे लोकार्पण लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष तथा लोकमान्य टिळक कन्या विद्यालय शाळा समितीचे अध्यक्ष ॲड. रवींद्रजी भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलित करुनविद्येची देवता माता सरस्वती व लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला मालार्पण करण्यात आले.

लोकमान्य टिळक यांच्या जयंती निमित्त विद्यालयात लोकमान्य टिळक यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे लोकार्पणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लो.टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष तथा लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचे शाळा समिती अध्यक्ष ॲड. रवींद्रभागवत हे होते. प्रमुख अतिथी म्हणून मंडळाचे सचिव गांगेय सराफ, उपाध्यक्ष श्रीपाद मुनगंटीवार, शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहित,




पर्यवेक्षिका प्रांजली महादानी यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका दुर्गपुरोहित मॅडम नी केले. तदनंतर वर्ग ५ वी ची विद्यार्थिनी आर्या कोहळे हीने लोकमान्य टिळकांच्या जीवनावर भाषण दिले. तसेच अनिल पेटकर सर यांनी टिळकांच्या लेखणीतून साकारलेल्या अनुच्छेदात वाचन केले. प्रमुख अतिथी मंडळाचे सचिव गांगेय सराफ यांनी टिळकांच्या जीवनावर विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांनी टिळकांच्या अंगी असलेलाबाणेदारपणा, आत्मविश्वास हे गुण सांगितले. कोणतेही काम हाती घेतले की ते काम टॉपचेच झाले पाहिजे असा त्याचा कटाक्ष होता. कोणतेही काम हे मन लावून करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

यावेळी लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचे सर्वांच्या उपस्थितीत ॲड. रवींद्र भागवत यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भागवत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. लोकमान्य टिळकांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले, याचा उद्देश हाच आहे की,

लोकमान्य टिळकांचे जीवनकार्य, त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण विद्यार्थीनी, शिक्षक व पालक यांना होत राहील या हेतूने करण्यात आले आहे. याप्रसंगी व्यवस्थापन मंडळाचे सदस्य दत्तप्रसन्न महादानी, ॲड. अभय पाचपोर, डॉ. राम भारत, लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्यराजपुरोहीत सर, उपमुख्याध्यापक सचिन जहागिरदार, पर्यवेक्षिका देगमवार मॅडम, पर्यवेक्षकम नोज पदलमवार, तसेच ज्ञान मंदिर कॉन्व्हेटच्या मुख्याध्यापिका कावडकर मॅडम,शाळेतील सर्व शिक्षक - शिक्षिका , शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थिनीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन पंकज चिमरालवार सर यांनी आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका प्रांजली महादानी यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता जोशी मॅडम नी वंदे मातरम गीत गायनाने केली.

# मुक्ताई विद्या मंदिराची आषाढी दिंडी उत्साहात

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२५, पेण :** अहिल्या महिला मंडळ, पेण संचलित मुक्ताई विद्या मंदिर, हेटवणे वसाहत येथे आषाढी एकादशीनिमित्त बालवाडी व प्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांची दिंडी मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात काढण्यात आली. कार्यक्रम ाची सुरुवात शाळेच्या प्रांगणात पालखी पूजनाने झाली.

त्यानंतर ज्ञानोबा-तुकाराम यांच्या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात पारंपरिक वेशभूषेतील चिमुकल्यांनी दिंडीला प्रारंभ केला. शाळेतून निघालेली दिंडी वाकरूळ येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात दर्शनासाठी गेली. त्यानंतर वाकेश्वर मंदिरात विद्यार्थ्यांनी अभंग व भारूड सादर करून उपस्थितांची मने जिंकली.बी दिंडीनंतर शाळेचे माजी विद्यार्थी प्रफुल पाटील यांच्या निवासस्थानी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सर्व विद्यार्थी, पालक आणि उपस्थितांना खाऊचे वाटप करण्यात आले.

तसेच वाकरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थिनींनी टाळ नृत्य सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. या सोहळ्यास अहिल्या महिला मंडळाच्या खजिनदार. सुषमा दातार यांच्यासह मंडळाचे सदस्य, पालक, शाळेचे माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेतर्फे सर्वांना शेंगदाण्याचा प्रसाद देण्यात आला. तसेच शाळेचे माजी पालक ओमकार हुजरे यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रसादाचे वाटप केले.




पारंपरिक वेशभूषेतील चिमुकल्यांचा उत्साह, हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरणाम ुळे संपूर्ण परिसर वारकरीमय झाला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षक सूरज पाडावे आणि सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात बातम्या

### म. फुले विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय पायी दिंडी सोहळा



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२५, गोवंडी (मुं.उपनगर) :** लेण्याद्री शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्यालयात आषाढी एकादशीच्या निमित्ताने शनिवार, दि.२५ जुलै २०२६ रोजी पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर अभंग, भजन आणि नामस्मरणाच्या माध्यमातून भक्तिमय वातावरणाची निर्मिती करण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठल या जयघोषांनी संपूर्ण विद्यालय परिसर दुमदुमून गेला.वारकरी वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकरी संप्रदायाची परंपरा जिवंत केली. विद्यार्थ्यांनी सादर केलेले अभंग, फुगड्या आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.यावेळी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. वारकरी परंपरेतून मिळणारे शिस्त, एकात्मता, सहकार्य, संस्कार आणि भक्तीभाव यांचे म हत्त्व अधोरेखित करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल आदरभाव निर्माण होण्यास मदत होते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारशाची ओळख होण्याबरोबरच भक्ती आणि सामाजिक मूल्यांचे शिक्षण ही मिळाले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

### दहिवलीच्या विठ्ठल मंदिरात कर्जत शारदा मंदिरच्या विद्यार्थ्यांची भक्तिमय आषाढी वारी



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२५, कर्जत (रायगड) :** कर्जत शहरातील शारदा मंदिर (मराठी माध्यम) शाळेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाची परंपरा, विठ्ठलभक्ती आणि भारतीय संस्कृतीचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच रुजावेत या उद्देशाने विद्यार्थ्यांनी दहिवली येथील श्री विठ्ठल मंदिरात आषाढी वारी काढली. या वारीमध्ये इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जयघोष करत मंदिरात प्रवेश केला. यावेळी भजन, अभंग आणि विठ्ठल भक्तीगीते सादर करून संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून टाकला. उपस्थित भाविकांनी विद्यार्थ्यांच्या भक्तिभावपूर्ण सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले. यावेळी कु.दिविजा पुरोहित यांनी विद्यार्थ्यांना आषाढी वारीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगत वारकरी परंपरेचे संस्कार जपण्याचे मार्गदर्शन केले. या उपक्रमाची संकल्पना संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे यांनी मांडली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रद्धा जामघरे यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. उपस्थित पालक व भाविकांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे व शाळेच्या या संस्कारक्षम उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

### श्री सोमेश्वर माध्यमिक विद्यालय आरखेड येथे भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा उत्साहात संपन्न



**अक्षराज : बालासाहेब फुलपागर**

**दि.२५, पालम (परभणी) :** देवशयनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून श्री सोमेश्वर माध्यमिक विद्यालय, आरखेड येथे पारंपरिक वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणारा भव्य दिंडी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी वेश परिधान करून विठ्ठल नामाचा गजर, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत संपूर्ण गाव भक्तिरसात रंगवून टाकले.शाळेपासून प्रारंभ झालेल्या दिंडी रॅलीत विद्यार्थी ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा जयघोषात सहभागी झाले.

टाळ, मृदंगाच्या साथीने अभंग आणि भक्तिगीते गात गावातील प्रमुख मार्गांवरून दिंडी काढण्यात आली. वारकरी वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. रॅली गावात पोहोचल्यानंतर विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात सजलेल्या विद्यार्थ्यांचेबळीराजा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तुषार गोळेगावकरतसेचप्राचार्य आरसुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेचे महत्त्व आणि भक्ती, संस्कार व सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण करणारा हा दिंडी सोहळा ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठीमुख्याध्यापक मोतीराम शिरसकर, उपमुख्याध्यापक गुंडेवाड , क्रीडा शिक्षक सिकंदर सय्यद तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### भोरखेडा आर.सी.पटेल विद्यालयात वृक्षारोपण




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२५, शिरपूर (धुळे) :** भोरखेडा येथील आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यालयाचे प्राचार्य सी.एन.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व पर्यवेक्षक एस.डी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठोबा-रुखमाईच्या वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या तालावर ताल धरून कार्यक्रमाचा आनंद घेतला.विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख एस.एम.पाटील व व्ही.एस.इशी यांनी वृक्षदिंडीचे आयोजन केले.

विविध रोपांची लागवड शालेय परिसरात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सूत्रसंचालन अर्चना वाल्हे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक आर.पी.देवरे, एम.जी.वाडिले, पी.टी. चौधरी, एस.एस.निकुंभे, एस.जी.भावसार, एस.एस.वानखेडे, पी.एस.परदेशी,एन.बी.पाटील, सुनील पावरा, चंदन पावरा,जी.के. राऊळ, ए.ए.पटेल, श्यामल पाटील, मीनाक्षी जैन, रूपाली तिरमल, ऐश्वर्या मोराणकर, आशा पाटील व विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.